






दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com | LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरवार १ मे २०२५ | अंक १४० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# OBC चा आकडा फुगवून: जास्तीचं आरक्षण..

# जातनिहाय जनगणनेवर मनोज जरांगे काय म्हणाले?



केंद्र सरकारने नुकतेच जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत यावर शिक्कामोर्तब झाले. दरम्यान, या निर्णयावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे यांनी या निर्णयाचे स्वागत केले असून ओबीसींचा आकडा फुगवून दाखवला होता, असा दावा करत आता खरं काय ते समोर येईल, असा विश्वास व्यक्त केलाय. मनोज जरांगे नेमकं काय म्हणाले? केंद्र सरकार जातीनिहाय जनगणना करत आहे, ही चांगली गोष्ट आहे. ही जनगणना होणं गरजेचं होतं, असं मत जरांगे यांनी व्यक्त केलं. तसच याआधीची जनगणना ही इंग्रजांनी केलेली होती. इंग्रजांनंतर जनगणनाच झाली नव्हती. ओबीसींचा आकडा फुगवून दाखवला होता, असा मोठा दावाही त्यांनी केला. अतिक्रमण करून जास्तीचं आरक्षण खाल्लं होतं. आता जातीनिहाय जनगणनेमुळे ते उघड तरी पडेल, असे म्हणत आता दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केलाय. नि:पक्षपाती काम करणारे लोक असावेत पण मला वाटते सरकारला जनगणना करण्याची आवश्यकता नव्हती. कारण आताच बाठीया आयोगाने निर्णय दिला आहे आणि ज्या शिफारशी केल्या आहेत त्यानेसुद्धा भागू शकले असते. पण सरकारची इच्छा असेल तर आमचा विरोध असणार नाही. आता जातीनिहाय जनगणनेसाठी जो आयोग गठीत केला जाईल किंवा समिती असेल त्यावरील लोक नि:पक्षपाती काम करणारे असावेत, अशी अपेक्षा जरांगे यांनी व्यक्त केली.

## ओबीसींचे आरक्षण 72 टक्क्यांवर न्यावे

फुगून आकडा दाखवायचा आणि मग देशातील लोक आंदोलनाचा पवित्रा घ्यायचे. याची काळजी मोदींनी आणि केंद्र सरकारने घेतली पाहिजे. या आयोगात सर्व जाती-धर्मातील लोक असले पाहिजेत. बाठीया आयोगाने जसे काम केले, त्या शिफारशी लागू केल्या पाहिजेत. खरी लोकसंख्या समोर आली पाहिजे. ओबीसींचा आरक्षण कोटा वाढवून 72 टक्क्यांवर नेला पाहिजे. आमच्यावर अन्याय झाला आहे. आमचे आरक्षण यांनी 75 वर्षे खाल्ले. आमची पोरं सुशिक्षित बेकार झाले, अशा भावनाही त्यांनी व्यक्त केल्या

## प्राथमिक पदवीधर शिक्षकांचे उपोषण तात्पुरते स्थगितयुवा नेते डॉ.योगेश क्षीरसागरांची मध्यस्थी; ना.अजितदादांसमोर प्रश्न मांडण्याची ग्वाही

बीड (प्रतिनिधी) दि.३० : जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक पदवीधर, भाषा व सामाजिक शास्त्र विषयाच्या ७४ शिक्षकांनी गणित व विज्ञान विषयांत रूपांतर करण्याच्या मागणीसह इतर विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू होते. उपोषणस्थळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२९) भेट देत शिक्षकांशी संवाद साधला. त्यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे उपोषण तात्पुरते




स्थगित करण्यात आले आहे. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले की, शिक्षकांच्या मागण्या न्याय्य असून त्या शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या जातील. उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यामार्फत शासनदरबारी पाठपुरावा करून या मागण्यांची योग्य ती दखल घेण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून शिक्षकांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्यावर लवकरात लवकर तोडगा काढण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीला प्रतिसाद देत, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांच्याद्वारे शिक्षकांना निरोप पाठवला आणि त्यानंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. या भेटीदरम्यान आनंद पिंगळे, सुमंत खांडे, विजय खोसे, सुमेध जोगदंड, दिपक घाटे, विकास गवते, दिलीपकुमार सानप, जितेंद्र सांगळे, निलेश चव्हाण यांच्यासह शिक्षक बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, शिक्षकांनी आपल्या मागण्यांकडे शासनाने तत्काळ लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## महाराष्ट्र दिनाचे मुख्य शासकीय ध्वजारोहण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते




बीड, दि. 29 : बीड येथील महाराष्ट दिनाचा मुख्य शासकीय सोहळा गुरुवार दि. 1 मे रोजी राज्याचे राज्यमंत्री उद्योग,सार्वजनिक बांधकाम इंद्रनील नाईक यांच्या हस्ते होणार आहे.मुख्य ध्वजारोहण सोहळा जिल्हा पोलीस मुख्यालय कवायत मैदान येथे सकाळी 8.00 वाजता होणार आहे. या समारंभास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## पवनचक्की कंपन्यांची दादागिरी सुरुच,विहिर खोदण्यासाठी राखीव जागेवरुन जबरदस्तीने विद्युत तारा ओढल्या; आता विहिर खोदायची कुठं मुळुकवाडी येथील शेतकरी हनुमान ढास यांचा सवाल :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- ( दि.३० ) बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांची दादागिरी सुरूच असुन गावातील स्थानिक दलालांच्या मदतीने गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनीतुन जबरदस्तीने विद्युत तारा ओढण्याचे काम सुरूच असुन बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतकरी हनुमान ज्ञानोबा ढास यांच्या मांगिरा शिवारातील गट नंबर १३९ मध्ये यांनी पाणाड्या कडुन तपासुन विहिर खोदण्यासाठी ८ गुंठे जमीन राखीव ठेवलेल्या जागेवरून १५ दिवसांपुर्वी तारा ओढु नका म्हणून विरोध केल्यानंतरही तारा ओढणार नाही असे आश्वासन दिले. याचवेळी ईतर धनदांडग्या शेतजमीन मालकांच्या शेतात रोवलेले विद्युत पोल विरोध



केल्यानंतर काढण्यात आले होते.आज सकाळी हनुमान ढास शेतात आले असता त्यांना विद्युत तारा ओढल्याचे आढळून आले.आता विहिर खोदायची कोठे असा प्रश्न त्यांना पडला आहे. लोकाभिमुख , गतिमान अभियान राबवत नागरीकांशी संवेदनशीलपणे व्यवहार करा म्हणणारे नवनियुक्त जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे तरी शेतकऱ्यांना न्याय देतील का? असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

लोकाभिमुख , गतिमान अभियान राबवत नागरीकांशी संवेदनशील व्यवहार करा म्हणणारे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन शेतकऱ्यांना न्याय देतील काय? :- डॉ.गणेश ढवळे बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार उघड्या डोळ्यांनी पहात त्यांचे हस्तक असलेले तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी शेतकऱ्यांची बाजू न घेता पवनचक्की कंपन्यांची बाजु घेत शेतकऱ्यांना ठकवले.आता नविन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची नियुक्ती झाल्याने १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा बैठकीत लोकाभिमुख, गतिमान अभियान राबवत नागरीकांसोबत व्यावहार करताना संवेदनशीलपणे करावा अशी सुचना देणारे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबवतील काय?? असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे. डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर मो.नं.८१८०९२७५७२

## मुख्याधिकारी यांच्या मनमानी कारभारामुळे मुख्य रस्त्यावरील चालू बोर बुजला बीड जिल्ह्याचे वरिष्ठ अधिकारी याकडे लक्ष देणार का ?

धारूर शहरातील मुख्य रस्त्याचे काम गेल्या एका महिन्यापासून सुरू असल्याने धारूर मुख्य रस्त्यावर बालाजी मंदिराजवळ चालू असलेले बोर नगर नगरपरिषदेने चालू बोअर उकरून बुजून टाकून त्या परिसरातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची भर उन्हाळ्यात हेळसांड केली असल्यामुळे वारंवार तोंडी सांगूनही किल्ले धारूर नगर परिषदेने तो बोअर चालू केलेला नसल्याने काल धारूर येथील संतप्त नागरिकांनी नगरपरिषद कार्यालयास बोर चालू करण्यात यावा असे निवेदन देण्यात आलेले




आहे गेल्या एका महिन्यापासून रस्त्याच्या कामामुळे नालीच्या कामामुळे किल्ले धारूर नगरपरिषदेने बालाजी मंदिर जवळील गेल्या कित्येक वर्षांपासून नागरिकांची तहान भागवणारा बोर किल्ले धारूर नगर परिषदेने रस्त्याच्या कामासाठी तो बुजला आहे व त्या ठिकाणी भर उन्हाळ्यात नागरिकांची पाण्यासाठी वन वन होताना दिसून येत आहे हे लक्षात घेता काल नागरिकांनी मुख्याधिकारी नगरपरिषद धारूर यांना निवेदन दिले आहे व निवेदनात असे म्हटले आहे की सदरील बोर हे दिनांक 4 मे पर्यंत कारव्यांनीवीत करा सुरळीत करा अन्यथा दिनांक 5 मे रोजी नगरपरिषद कार्यालय समोर उपोषणास बसणार आहोत असे या निवेदनात म्हटले आहे व निवेदनात रोहित मुकुंद फावडे विनोद कोकाटे नितीन शेटे प्रवीण शेटे महेश शेटे असे यांच्यासह अन्य नागरिकांच्या सह्या आहेत.

### नगरपरिषदेने तात्काळ बोर चालू करावा अन्यथा उपोषण करणार – रोहित फावडे

किल्ले धारूर नगरपरिषदेने केलेला हा कारभाराने मागच्या एक महिन्यापासून नागरिकांच्या तोंडाचा घास हिसकावून घेतलेला आहे. नगरपरिषदेचे डोके ठिकाणावर आणण्यासाठी दि.29 एप्रिल रोजी निवेदन देऊन चार दिवसात तात्काळ बोर चालू करण्यासाठी निवेदनाद्वारे मागणी केली असून अन्यथा 5 मे पासून उपोषण करणार आहे.

# १०६ हुतात्मे, भाषावार प्रांत १ मे १९६० रोजी नेमकं काय घडलं? महाराष्ट्र दिनाचा इतिहास काय?

भारत देशाला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. पण त्यानंतरही महाराष्ट्र स्वतंत्र नव्हता. त्यावेळी देशाचा नकाशा वेगळा होता. भाषा आणि प्रदेशाच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्यात आली. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यामुळे आजच्या दिवसाला एक वेगळे ऐतिहासिक महत्त्व आहे. १ मे हा दिवस महाराष्ट्र दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस मराठी माणूस मोठ्या उत्साहाने साजरा करतो. महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी १०६ हुतात्म्यांनी बलिदान दिले होते. त्यामुळे त्यांचे स्मरण या दिवशी केले जाते. १ मे हा दिवस महाराष्ट्र दिनासह आंतरराष्ट्रीय कामगार दिवस म्हणूनही ओळखला जातो. आज राज्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मुंबई प्रांतात अनेक प्रांतीय राज्यांचा समावेश करण्यात आला होता. या प्रांतात गुजराती आणि मराठी भाषिक लोक एकत्र राहत होते. त्यानंतर भाषावार प्रांत रचनेची मागणी जोर धरू लागली. गुजराती भाषिकांनी स्वतःच्या राज्याची मागणी केली, तर मराठी भाषिकही स्वतंत्र राज्यासाठी संघर्ष करत होते. या मागणीसाठी अनेक आंदोलने झाली आणि याच आंदोलनांच्या परिणामामुळे १९६० मध्ये मुंबई पुनर्रचना कायद्यांतर्गत महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांची निर्मिती झाली. १०६ हुतात्म्यांचे बलिदान २१ नोव्हेंबर १९५६ रोजी फ्लोरा फाउंटन परिसरात तणाव होता. राज्य पुनर्रचना आयोगाने मुंबई महाराष्ट्राला देण्यास नकार दिल्याने मराठी जनता संतप्त झाली होती. निषेध सभांमधून वातावरण तापले होते. कामगारांचा एक मोठा मोर्चा सरकारचा निषेध करण्यासाठी फ्लोरा फाउंटन येथे जमला. पोलिसांनी लाठीचार्ज करूनही सत्याग्रही डगमगले नाहीत. अखेर तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या आदेशाने गोळीबार झाला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०६ आंदोलकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. या हुतात्म्यांच्या बलिदानाला आणि मराठी माणसाच्या आंदोलनाला यश आले आणि १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. त्यानंतर १९६५ मध्ये फ्लोरा फाउंटन येथे हुतात्मा स्मारकाची उभारणी करण्यात आली. आज आपण महाराष्ट्र दिन मोठ्या अभिमानाने साजरा करत असलो, तरी या शूर हुतात्म्यांचे स्मरण करणे आपले कर्तव्य आहे. राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन आज महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ठाण्यात पोलीस क्रीडा संकुल, साकेत मैदानावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, जिल्हा परिषद अध्यक्ष रोहन घुगे आणि पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मानवंदना दिली. दुसरीकडे, मुंबईत पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. या सोहळ्याला खासदार कल्याण काळे, आमदार अर्जुन खोतकर, जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ आणि पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांच्यासह अनेक प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. पुरोगामी आणि प्रगतीशील राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गावर चालत, महाराष्ट्र देशाच्या विकासात नेहमीच महत्त्वपूर्ण योगदान देत राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरवार १ मे २०२५
https://lokaarambh.com




## संपादकीय

### पाकिस्तानला जन्माची अद्दल घडवावीच

आजवर भारताने अनेक आतंकवादी हल्ले सहन केले आहेत. प्रत्येक हल्यानंतर ङभारताने पाकिस्तानला जन्माची अद्दल घडवावीफ, ङपाकव्याप्त काश्मीर ताब्यात घ्यावाफ, ङआतंकवाद्यांना मदत करणाऱ्या स्थानिकांवर देशद्रोहाचा खटला भरावाफ यांसारख्या प्रतिक्रिया देशातील नागरिकांमध्ये स्वाभाविकपणे उमटतात. पूर्वी व्यक्त होण्याची माध्यमे मर्यादित होती. आता व्यक्त होण्यासाठी सोशल मीडियाचे अनेक प्लॅटफॉर्म्स लोकांसमोर विनामूल्य उपलब्ध आहेत. २०१४ नंतर देशात झालेले सत्तांतर, सोशल मीडियाचा वाढत चाललेला वापर, देशातील नागरिकांवर विशेषतः तरुणांवर वाढलेला धर्म आणि राष्ट्रप्रेमी विचारांचा प्रभाव यांमुळे अशा घटनानंतर व्यक्त होण्याचे प्रमाण पूर्वीच्या तुलनेत कैक पटीने वाढले आहे. राष्ट्रप्रेमी जनतेचा हा रोष पुलवामा हल्याच्या वेळीही मोठ्या प्रमाणात दिसून आला. ज्याचा परिणाम म्हणून सरकारला पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राईक करून जनतेला आश्वस्त करावे लागले. आजपर्यंत देशावर झालेल्या आतंकवादी हल्यांच्या तुलनेत पहलगाम येथील हल्ला थोडा वेगळा यासाठी आहे कारण या हल्याचे दायित्व आजतगायत कोणत्याही आतंकवादी संघटनेने घेतलेले नाही. दुसरी बाब म्हणजे या हल्यात आतंकवाद्यानी ज्यांना लक्ष केले ते हिंदू आहेत ना याची नीट खात्री करून केवळ त्यांनाच त्यांच्या बायको मुलांच्या समोर गोळ्या घातल्या गेल्या. त्यामुळे आतंकवादाला धर्म नसतो हे आजपर्यंत पसरवण्यात आलेले नरेटिव्ह पूर्णतः खोटे सिद्ध झाले. केवळ देशातच नव्हे तर आजतागायत जगभरात जे काही आतंकवादी हल्ले झाले आहेत त्यातील बहुतांश हल्ले हे एकाच पंथाच्या आतंकवाद्यांनी केले आहेत त्यामुळे आतंकवादाला धर्म नसतो असे कसे म्हणता येईल? ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशात निर्माण झालेली अराजकसदृश्य परिस्थिती आजतागायत कायम आहे. मागील आठ महिन्यांत बांगलादेशातून हजारो हिंदू ंना आपले घरदार, जमीन जुमला सोडून पलायन करावे लागले आहे. कित्येक हिंदू ंना मारहाण करून त्यांची हत्या करण्यात आली, हिंदू ंच्या बाया-बापड्यांवर अत्याचार करण्यात आले, हिंदू ंची शक्तिस्थाने असलेली मंदिरे आणि त्यांतील देवतांच्या मूर्ती फोडण्यात आल्या. बांगलादेशच्याच पावलावर पाऊल ठेवत पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथील हिंदू ंनाही स्थानिक शांतीप्रिय समाजाने त्यांच्या राहत्या घरातु ंन बाहेर काढून राज्य सोडन्यास भाग पाडले. बांगलादेश आणि मुर्शिदाबाद येथील घटना ताज्या असतानाच पहलगाम येथील आतंकवादी हल्यात केवळ हिंदू ंनाच लक्ष केले गेल्याने देशभरातील समस्त हिंदू समाजात प्रचंड रोष निर्माण झाला आहे, हा रोष वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त केला जात आहे. मुबईतील सांताक्रु ज येथील काही राष्ट्रप्रेमी नागरिकांनी हा रोष व्यक्त करताना पाकिस्तान, बांगलादेश आणि पॅलेस्टाईन यांच्या झेंड्यांचे चित्र असलेल्या भित्तिपत्रकांवर ङमुर्दाबादफ असे लिहून ही पत्रके परिसरातील भितींवर लावली ज्यामुळे तेथील शांतीप्रिय समाजातील काही लोकांनी ही भित्तीपत्रके फाडून हिंदू तरुणांशी वाद घालण्याचा आणि दंगल घडवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने त्यांच्या मनसुब्यावर पाणी फेरले गेले. बहुसंख्य हिंदू असलेल्या भारतात पाकिस्तानचा निषेध करणे गुन्हा आहे का असा सवाल आता राष्ट्रप्रेमी जनतेकडून विचारला जात आहे. ज्या बांगलादेशने आणि पाकिस्तानने आजतागायत भारताच्या विरोधात कुरघोड्या करण्यात आणि भारतात आतंकवादी कारवाया करण्यात धन्यता मानली आहे. ज्यांनी देशाच्या सीमेवर आजपर्यंत शेकडो निरपराध भारतीय सैनिकांना गोळ्या घालून ठार केले आहे अशा पाकिस्तानचा भारतात निषेध का करू नये ? कर्नाटकातील कलबुर्गी येथेही हाच प्रकार घडला. पाकिस्तानचा निषेध म्हणून रस्त्यावर लावलेले पाकिस्तानचे झेंडे तेथील शांतीप्रिय समाजातील महिलांनी अत्यंत आदरपूर्वक काढले. भारतात राहून, भारतीय लोकशाहीने दिलेल्या सुख सुविधा उपभोगून, भारतात रोजीरोटी कमवून येथे भयमुक्त जीवन जगून ज्यांना पाकिस्तानचा निषेध केला म्हणून पोटशूळ उठतो अशांचे इमान नक्की भारताशी आहे की पाकिस्तानशी याचा तपास का घेतला जात नाही ? पाकिस्तानचा निषेध केला म्हणून ज्यांना संताप येतो आणि या निषेधाचा विरोध करण्यासाठी जे रस्त्यावर उतरून जाब विचारतात, समाजात दंगल भडकवण्याचा प्रयत्न करतात अशा समाजद्रोह्यांना का पाठीशी घातले जात आहे ? ज्या औरंगजेबाने स्वराज्याचे धाकले धनी छत्रपती संभाजी महाराज यांना हालहाल करून ठार मारले त्या औरगजेबाच्या नावाने असलेल्या शहराचे नाव बदलण्याचा निर्णय जेव्हा राज्य सरकार घेते तेव्हा त्याला विरोध करण्यासाठी हजारो जण रस्त्यावर उतरतात. सरकारने हा निर्णय मागे घ्यावा यासाठी त्यांचे लोकप्रतिनिधी जाहीररीत्या रोष प्रकट करतात. महाराष्ट्रात राहून छत्रपती संभाजी महाराज नव्हे तर औरंगजेब ज्यांना जवळचा वाटतो अशांचा आदर्श कोण आणि यांचे इमान कोणाशी आहे याची पोलीस चौकशी का केली जात नाही ? स्वराज्यावर आलेल्या अफजलखानरूपी संकटाने स्वराज्यातील अनेक मंदिरे नेस्तनाबूत केली, तुळजापुरातील भवानी मातेची मूर्ती फोडली, पंढरपुरातील पांडुरंगाच्या मंदिरावावरही तो चाल करून गेला, हजारो हिंदू ंच्या कत्तली केल्या, अनेक हिंदू बाया नासवल्या. अशा संकटाचा सामना शक्तीने नव्हे तर युक्तीने करण्याचा निर्णय छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतला. स्वराज्यावर आलेल्या संकटाला स्वराज्यातच गाडला. धूर्त आणि कपटी अफजलखानाला महाराजांनी प्रतापगडावर लोळवला. अफजलखानवध हे प्रकरण म्हणजे महाराष्टाच्या इतिहासातील सोनेरी पान. आतंकवादाचा सामना कसा करावा याचे जिवंत उदाहरण; मात्र अफजलखानवधाचे पोस्टर लावले म्हणून मिरजेत दंगल उसळते आणि तत्कालीन सरकार या अफजलखान वधाच्या चित्रावरच अघोषित बंदी घालते, इतिहासाच्या पुस्तकातील अफजलखानवधाचे चित्र हटवले जाते. ज्या ज्या ठिकाणी हे चित्र उभारले जाते त्याविरोधात एका वर्गाकडू न पोलिसांत तक्रारी दाखल केल्या जातात आणि पोलिससुद्धा हे चित्र काढून टाकण्याचे आदेश देतात. शिवरायांच्या महाराष्ट्रात शिवरायांचा पराक्रम दाखवल्यामुळे ज्यांच्या भावना दुखावतात अशांच्या भावना नक्की कोणाशी जोडल्या गेल्या आहेत याची चौकशी कोण करणार ? १९९३ च्या मु ंबई बॉम्बस्फोटातील प्रमुख आरोपी याकूब मेमन याला जुलै २०१५ मध्ये फासावर लटकवण्यात आले. त्याची अंत्ययात्रा मु ंबईतुन काढण्यात आली तेव्हा त्या अंत्ययात्रेत त्याच्या समाजाचे लाखो लोक सहभागी झाले होते. याकूब मेमन हा कोणी क्रांतिकारी किंवा सेलिब्रे ंटी नव्हता तर शेकडो निरपराध्यांचे जीव घेणाऱ्या बॉम्बस्फोट मालिकेतील मुख्य आरोपी होता. एका देशद्रोही आरोपीच्या अंत्ययात्रेला येणाऱ्या लाखो लोकांचे इमान कोणाशी होते याची चौकशी त्यावेळी का केली नाही ? कोणताही आतंकवादी हल्ला हा स्थानिकांच्या मदतीशिवाय होऊच शकत नाही. पहलगाम येथे झालेला हल्ला सुद्धा स्थानिकांच्या मदतीनेच करण्यात आला होता याचे पुरावे प्रत्यक्षदर्शींनी दिले आहेत, ताशा स्वरूपाचे व्हिडीओजही आज सोशल मीडियातून फिरत आहेत, असे असताना तेथील स्थानिकांची चौकशी करण्याऐवजी त्यांना देशभक्त दाखवण्याची चढाओढ करणाऱ्या राजकारणी आणि वृत्तवाहिन्यांचे ईमान कोणाशी आहे याची चौकशी कधी केली जाणार आहे ?

# मानव कल्याणासाठी बसवेश्वर महाराजांच्या कार्याचे अनुकरण आवश्यक

बसवेश्वर महाराजांना कोणत्याही प्रकारचा लोभ नसल्यामुळे न्याय प्रीय राजा होते.बसवेश्वर महाराज हे बसव,बसवण्णा इत्यादी नावाने ओळखले जात असले तरीही थोर समाजसुधारक म्हणून त्यांची मोठी ख्याती होती.त्यामुळे त्यांचे कार्य आजही तेवढेच महत्त्वाचे व गरजेचे आहे.इ.स.११०५ ते ११६५या कालखंडात होऊन गेलेले कर्नाटकातील संत व समाजसुधारक होते. त्यांनी नेहमी निर्गुण व निराकार एकेश्वरवाद श्रध्देचा पुरस्कार केला. कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या गावात ११०५ साली वीरशैव कुटुंबात बसवेश्वर महाराजांचा जन्म झाला. मुख्यत्वेकरून त्यांचा जन्म अक्षतृतीयेला झाला.अक्षतृतीया हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक व महत्वाचा दिवस मानल्या जातो. त्यामुळे या दिवसाला शुभ मानण्यात येते. बसवेश्वर महाराज कर्मठ विधीचा विरोध करायचे अशा परिस्थितीत मु ंजीचा विरोध करून मला आधीच लिंगदीक्षा मिळाली आहे असे सांगत वयाच्या ८ व्या वर्षी घर सोडून ते कूडलसंगम येथे निघून गेले.कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे मोठे अध्ययन केंद्र होते.तेथे बसवेश्वरांनी १२ वर्षे वास्तव्य केले. कुडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा,धर्म, तत्वज्ञान इत्यादींचा प्रगल्भ अभ्यास केला.त्यांचा विवाह मामाच्या मुलीशी झाला व त्यानंतर सोलापूरातील मंगळवेढा येथे आले. बसवेश्वरांनी मंगळवेढा येथे लोकशाही संसद स्थापन केली.या संसद मंडपात सर्व धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणींवर कशी मात करायची यावर चर्चा करून व योग्य निर्णय घेवून पुढील कार्य होत असे. बसवेश्वर यांचे एकच उद्दिष्ट होते ते म्हणजे समाजातील वाईट चालीरितीचा विरोध करून समाजाच्या हिताच्या गोष्टींची अंमलबजावणी करण्याकडे जास्त महत्त्व देत असे.१२ व्या शतकातील आदर्श, समतेचे, जनकल्याणाकारी प्रणेते म्हणून बसवेश्वर महाराज ओळखले जायचे.त्यामुळेच १२ व्या शतकापासून खऱ्या अर्थाने





रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर),
६३ बी शिवनगर नागपूर-९.
मो.नं.९३२५१०५७७९.

लोकशाहीला सुरूवात झाल्याचे सांगण्यात येते.कारण लोकशाहीमध्ये समता,मुल्य, न्याय, बंधू ंता,एकात्मता, संपूर्ण स्वतंत्र, अधिकार,नियम, नियंत्रण, शिस्त,सूशासन व योग्य प्रशासन यामुळे समाज व देश घडण्यास मोठी मदत मिळते. बसवेश्वर महाराजांच्या संसदेत जातीभेला बीलकुलच थारा नव्हता.त्यामुळे त्यांना समाजाला एकत्र बांधण्यास मोठी मदत मिळाली. कारण कोणत्याही प्रकारचा भेदभाव ते कदापि सहन करत नसे. आपल्याला २१ व्या शतकात जे कायदे दिसतात त्यात बसवेश्वर महाराजांचा सिंहांचा वाटा आहे.बसवेश्वर महाराजांना साक्षात नंदीचा अवतार मानल्या जाते.आपण ज्याला शंकरजीच वाहन म्हणतो.भगवान शंभर या पृथ्वीचा,मानव, पशुपक्षी व जीवजंतू यांचा पालनहार आहे. त्यांच्या सोबत नंदी म्हणजे साक्षात परमेश्वर बसवेश्वर महाराज म्हणजे ही दैवी लीलाच म्हणावी लागेल.कृष्णा आणि मलापहारी नद्यांच्या संगमावर असलेल्या गुरूकुलात ज्ञानी गुरूजनांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिक्षण घेतले.विविध ग्रंथांचा, ज्ञानाच्या सर्व शाखांचा अभ्यास केला. त्यामुळेच त्यांनी संस्कृत ग्रंथातील धर्मतत्वे कन्नडमधुन लिहिली. बसवेश्वर महाराजांनी नेहमी आध्यात्मिक जीवन व समाज घडवीण्याच्या चालीरीतीचे मार्गदर्शन नेहमीच करीत असे. कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्रात आपल्याला लोकांच्या जिभेवर आजही बसवेश्वरांची वचने आरूढ झाल्याचे दिसून येते. सत्ता वैभव आणि कीर्ती याला यत्किंचितही वाव न देता आध्यात्मिक व नितिमुल्याला प्रथम प्राधान्य देवून समाज हितासाठी अहोरात्र प्रयत्न केले. बसवेश्वरांच्या काळात समाजव्यवस्थेत स्त्रीयांना शुद्र, बहिष्कृत समजले जायचे. त्यांना स्त्रीयांवर होत असलेला अत्याचार सहन झाला नाही. याकरीता त्यांनी या विरूद्ध मोठा लढा उभारून मोठे भरीव कार्य केल्याचे दिसून येते.तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह महात्मा बसवेश्वरांच्या पुढाकाराने १२ व्या शतकात घडला.त्यामुळे बसवेश्वर महाराजांचे प्रत्येक कार्य व त्यांची जीवनशैली आज समाजाला प्रेरणादायी ठरू शकते व ठरत आहे.आज देशातील राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्वर महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन समाज हितांचे व देश हिताचे कार्य करण्याची नितांत गरज आहे. राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्वर महाराजांचे अनुकरण करून भ्रष्टाचार व वाजवीपेक्षा जास्त असलेली चल-अचल संपत्तीचा त्याग करून सरकारी तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे व महात्मा बसवेश्वरांचे आदर्श सामोरं ठेऊन समाजकार्य केले तरच खऱ्या अर्थाने राजकीय पुढाऱ्यांमार्फत बसवेश्वर महाराजांची जयंती साजरी झाली असे गृहीत धरले जाईल. कारण राजकीय पुढाऱ्यांजवळ समाजसेवक, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी अशी मोठी जबाबदारीची आणि नामांकित पदे आहेत.त्याचा उपयोग समाज घडविण्यासाठी व्हायलाच हवा.बसवेश्वर महाराजांजवळ कोणतेही पद नसताना समाज हितासाठी अहोरात्र कार्य केले.कारण ते त्यागी, निष्ठावान,महान समाजसेवक व समाजसुधारक होते.त्यांचे अनुकरण करून आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी कार्य करण्याची नितांत गरज आहे.वैशाख शुद्ध तृतीया म्हणजे अक्षय्य तृतीया यांच दिवशी महात्मा बसवेश्वरांचा जन्म झाला. त्याचप्रमाणे याच दिवशी पराक्रमी भगवान परशुराम यांचाही जन्म झाला हा एक संयोगच म्हणावा लागेल.अक्षय्य तृतीया या शुभ मुहूर्ताचे औचित्य साधून,महात्मा बसवेश्वर आणि भगवान परशुराम यांच्या जयंतीचे शुभ संकेत लक्षात घेता या भारत भुमित आजच्या दिवशी प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावुन आगळावेगळा ऐतिहासिक उपक्रम राबवुन पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प संपूर्ण मानवजातीने करायला हवा.कारण मानवजातीच्या कल्याणासाठी आज तीन दैवी शक्ती एकत्र विराजमान आहेत. त्यामुळे तीन दैवी शक्तीचा (अक्षय्य तृतीया, बसवेश्वर जयंती, परशुराम जयंती) संयोग दिवस ३० एप्रिलला उजाडला आहे.यामुळे प्रत्येकांनी वृक्षारोपण करून मानवजातीचा धर्म पाळला पाहिजे.यामुळे ऑक्सिजनची मात्रा वाढेल व मानवजातीचे कल्याण होईल, गुरांना मोठ्या प्रमाणात चारा मिळेल, पशुपक्ष्यांना शुद्ध हवा व सावली मिळेल.यातच आपल्याला अक्षय्य तृतीया,महात्मा बसवेश्वर, भगवान परशुराम यांचे दर्शन घडुन येईल यात दुमत नाही. कारण संपूर्ण वृक्षांच्या जळा-मूळात, फळात, फुलात, पानात व झाडांच्या कणाकणात आपल्याला थोरमहात्म्यांचा, साधुसंतांचा व बसवेश्वर महाराजासह संपूर्ण देवी देवतांचा वास अवश्य दिसून येईल.

## सामाजिक क्रांतीचे जनक : महात्मा बसवेश्वर

सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर यांची आज जयंती. दरवर्षी अक्षय तृतीयेला महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी केली जाते. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म ११०५ मध्ये झाला. महात्मा बसवेश्वर हे बिज्जल राज्याच्या दरबारात महामंत्री होते. महात्मा बसवेश्वर यांना सामाजिक क्रांतीचे जनक असे म्हणतात कारण त्यांनी प्रचलित सनातनी धर्मातील कर्मकांड, अंधश्रद्धा, जातीव्यवस्था, स्त्री-पुरुष, उच्चनीच, श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव यासारख्या कुप्रथांच्या विरोधात बंड पुकारले. हे बंड म्हणजे माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारणाऱ्या संस्कृती विरुद्ध पुकारलेला एल्गार होता. या बंडात सामाजिक क्रांतीची बीजे पेरली गेली होती. बाराव्या शतकात भारताचे समाज जीवन अंधकारमय झाले होते. समाजात अंधश्रद्धा, कर्मकांड, भेदभाव वाढत चालला होता. बहुदेवता उपासना, पुरोहित वर्गाची मक्तेदारी, पाप पुण्याची दहशत, उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री- पुरुष भेदभाव इत्यादींनी भारतीय समाजमन बेजार झाले होते. अशा वेळी भारतीय समाजमन जागृत करुन माणसाला माणूसपण मिळवून देण्याचे काम महात्मा बसवेश्वर यांनी केले. त्यासाठी त्यांना तत्कालीन समाजसत्तेशी, राज सत्तेशी मोठा संघर्ष करावा लागला. माणूस हा जन्माने नव्हे तर कर्माने मोठा होतो अशी त्यांची धारणा होती म्हणूनच तत्कालीन व्यवस्था बदलून न वी समाजव्यवस्था त्यांचे निर्माण केली. जिथे उच्च नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री-पुरुष, जात पात असा कुठलाही भेदभाव नाही, विषमता नाही. कर्मकांड, अंधश्रद्धा नाही अशी समाजव्यवस्था महात्मा बसवेश्वर यांनी आपल्या अलौकिक विचारधारेतून आणून दाखवली म्हणूनच त्यांना दक्षिणेतील गौतम बुद्ध असे म्हणतात. प्रत्येकाने कर्म करूनच जगले पाहिजे. जन्माच्या आधारे भेदभाव नाही. या त्यांच्या या विचा र ां ची अंमलबजावणी पुढे डॉ.बाबासाहेब आ ंबेडकरा ंनी संविधानात केली. जगातील पहिली संसद असे ज्याचे वर्णन केले जाते ती अनुभव मंटप नावाची परंपरा त्यांनी सुरू केली. अनुभव मंटप हे असे सार्वजनिक ठिकाण होते जिथे सर्व समाज घटकांतील स्त्री पुरुष एकत्र बसून आपआपले अनुभव सांगत आणि त्यातून समाज म्हणून एकत्रितपणे पुढे जाण्याचे नियम ठरत. महात्मा बसवेश्वरांचे एक वचन आहे. कायकवे कैलास कैलास म्हणजे मोक्ष, म्हणजे काम केल्यानेच मोक्ष मिळतो. मोक्ष मिळवण्यासाठी कुठल्याही कर्मकांडाची गरज नाही. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या सहकार्याच्या मुलगा आणि मुलीच्या विवाहास समर्थन दिले जो आंतरजातीय विवाह होता. मुलगा हा चांभार समाजाचा तर मुलगी ब्राह्मण समाजाची होती. महात्मा बसवेश्वरांच्या या सुधारणावादी, समतावादी कार्याने खवळलेल्या सनातन्यांनी या घटनेचे भांडवल करून लोकांना भडकवले आणि दुसऱ्या बाजुला राजा बिज्जलचा खून करुन त्याचा आळ महात्मा बसवेश्वरांवर आणला. सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव महात्मा बसवेश्वर जीव वाचवण्यासाठी तेथून पळाले पण सनातन्यांनी अनेक शरण, शरणार्थ्यांची हत्या केली. त्यांनतर महात्मा बसवेश्वरांनी पुन्हा समतावादी लिंगायत धर्माची परंपरा वाढवण्याचा प्रयत्न केला. महात्मा बसवेश्वर यांचे समतावादी, सुधारणावादी विचार आपल्या जीवनात आचरणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. जयंतीदिनी महात्मा बसवेश्वर यांना विनम्र अभिवादन!

# आळंदी संमेलनातील उज्जैनकर फाउंडेशनच्या राखीची हेरिटेज वर्ल्ड टॉप रेकॉर्डमध्ये झाली नोंद

## 1 मे रोजी मिळाले ऑनलाईन प्रमाणपत्र

शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन हे गेल्या १५ वर्षापासून मुक्ताईनगर तालुक्यामध्ये आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये विविध प्रकारचे शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक, कला, आरोग्य अशा विविध क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे नुकतेच ४ जानेवारी २०२५ रोजी शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या सप्तशतकोत्तर जयंती महोत्सवी वर्षानिमित्त आणि आदिशक्ती संत मुक्ताबाई यांच्या ७४५ व्या सप्तशतकोत्तर जयंती महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित तिसरे राज्यस्तरीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलन मोरया मंगल कार्यालय, आळंदी देवाची ता. खेड जि. पुणे या ठिकाणी ऐतिहासिक स्वरूपाचे संपन्न झाले याप्रसंगी आदिशक्ती संत मुक्ताई कडून संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांना ७५० फूट लांब व ७५ किलो जाड वजनाची राखी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ .शिवचरण उज्जैनकर, एमआयटीच्या महासंचालिका स्वातीताई साठे, कराड व संमेलनाच्या अध्यक्ष प्रा .सुमतीताई पवार व मान्यवरांच्या शुभहस्ते या दिवशी सकाळी ठीक ८.०० वाजता संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर आळंदी येथे अर्पण करण्यात आली त्यानंतर या संमेलनाच्या ग्रंथदिंडीस तेथून प्रारंभ करण्यात आला या ग्रंथ दिंडीमध्ये श्री संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे विद्यार्थी यांनी विविध महान संतांच्या वेशभूषा करून टाळ मृदंगाच्या निनादांमध्ये ही ग्रंथदिंडी भव्य आणि दिव्य निघाली.याप्रसंगी उज्जैनकर फाउंडेशनचे महाराष्ट्रातील विविध पदाधिकारी, साहित्यिक, रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही राखी एमआयटीचे संत ज्ञानेश्वर बी.एड. कॉलेजचे प्राचार्य तथा या संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. सुरेंद्र हेरकळ यांच्या कल्पनेतून त्यांनी तयार केली होती. हे संमेलन ऐतिहासिक, आध्यात्मिक व विश्व रेकॉर्ड करणारे ठरले या संमेलनाला एमआयटीचे संत ज्ञानेश्वर बी . एड.कॉलेज, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था आणि श्री ज्ञानेश्वर चरित्र समिती, आळंदी देवाची यांचे अनमोल सहकार्य लाभले.

उज्जैनकर फाउंडेशन तर्फे मराठी भाषा प्रचार आणि प्रसारासाठी वर्षातून दोन मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येते. नुकतेच आळंदी येथील राखी हेरिटेज वर्ल्ड टॉप रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात आली त्या संदर्भातील ऑनलाईन पत्र संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर यांना नुकतेच १ मे रोजी प्राप्त झाले यापूर्वी त्यांच्या पंख पिसारा या ५१ व्यक्तींच्या व्यक्तिरेखांच्या ग्रंथास सुद्धा महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झालेली आहे त्यानंतर लॉकडाउनच्या काळात उज्जैनकर फाउंडेशन तर्फे १५५ मराठी व्याख्यात्यांची महा फेसबुक लाईव्ह व्याख्यान माला आयोजित करण्यात आली होती ही फेसबुक लाईव्ह महा व्याख्यानमाला सुद्धा द ग्रेट इंडियन बुक ऑफ रेकॉर्डने नोंदलेली होती त्याबद्दल डॉ. शिवचरण उज्जैनकर यांचे महाराष्ट्रातील व राज्याबाहेरील फाउंडेशनच्या विविध सन्माननीय पदाधिकाऱ्यां तर्फे अभिनंदन होत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरवार १ मे २०२५
https://lokaarambh.com



## पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते ध्वजवंदन

### पोलीस मैदानावर महाराष्ट्र दिनाचा 1 मे रोजी सकाळी शासकीय समारंभ

नांदेड जिह्ला प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : महाराष्ट्र राज्याचा 66 वा स्थापना दिवस समारंभ गुरूवार 1 मे 2025 रोजी वजिराबाद पोलीस मुख्यालय कवायत मैदान नांदेड येथे सकाळी 8 वा. राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभ होणार आहे. राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल यांच्या हस्ते ध्वजवंदन होणार आहे. या समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन नांदेड जिह्ला प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे. या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता यावे यासाठी इतर सर्व कार्यालय, संस्था, आदींनी त्यांचे ध्वजवंदनाचे समारंभ सकाळी 7.15 पुर्वी किंवा 9 वाजेनंतर आयोजित करावेत. सर्व निमंत्रितांनी राष्ट्रीय पोशाखात समारंभ सुरू होण्यापूर्वी 20 मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया बँग सोबत आणू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या दिनानिमित्त विविध कार्यक्रम, समारंभ आदी ठिकाणी राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पध्दतीबाबत शासन परिपत्रक तसेच ध्वजसंहितेतील सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. गृहविभागाच्या राष्ट्रध्वजाच्या उचित सन्मानाबाबतच्या परिपत्रकात नमूद केलेल्या निर्देशनानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकचा वापर होणार नाही, याची दक्षता संबंधितानी घ्यावी, असेही आवाहनही केले आहे.

## नीट प्रवेश परीक्षा काळात प्रतिबंधीत वस्तुंच्या वापरावर प्रशासनाचे कडक लक्ष

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : राष्ट्रीय परीक्षा एजेंसी नवी दिल्ली मार्फत आयोजीत नीट NEET (UG) प्रवेश परीक्षा नांदेड जिल्ह्यात आयोजीत करण्यात आली आहे. या परिक्षेसाठी जिल्ह्यात एकुण 56 केंद्र नियोजीत असून त्यापैकी नांदेड शहरात 46 केंद्र, मुदखेड तालुक्यात 4 केंद्र, नायगाव तालुक्यात 4 केंद्र व बिलोली तालुक्यात 2 केंद्रावर ही परीक्षा रविवार 4 मे 2025 रोजी नियोजीत आहे. नीट (UG) प्रवेश परीक्षाकरीता पात्र उमेदवारांनी रविवार 4 मे 2025 रोजी सकाळी 11 वाजेपर्यत पोहचण्याचे प्रयोजन करावे, असे आवाहन जिह्लाधिकारी राहूल कर्डीले नांदेड यांनी केले आहे. परिक्षार्थी मार्फत कुठल्याही गैर मार्गांचा अवलंब परीक्षा काळात होऊ नये. जसे ईलेक्ट्रोनीक उपकरणांचा, ब्लुटूथचा वापर आळा बसणे अनुषंगाने परिक्षार्थी यांची परीक्षा केंद्रावर वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत कान, नाक, घसा संबंधाने तज्ज्ञांकडून तपासणी केली जाणार आहे. उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत नीट NEET (UG) प्रवेश परीक्षा केंद्रामध्ये पुढील वस्तू घेऊन जाण्याची परवानगी नसणार आहे. उमेदवाराने आणलेल्या कोणत्याही वस्तूच्या सुरक्षिततेसाठी परीक्षा केंद्र जबाबदार नसेल. मजकूर साहित्य (मुद्रित किंवा लिखित), कागदाचे तुकडे, भूमिती/पेन्सिल बॉक्स, प्लास्टिक पाउच, कॅल्क्युलेटर, स्केल, लेखनपॅड, पेनड्राइव्ह, इरेजर, कॅल्क्युलेटर, लॉगटेबल, इलेक्ट्रॉनिक पेन, स्कॅनर इत्यादी कोणतीही स्टेशनरी वस्तु उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर आणू नयेत.

## थोरवी भीमाची

दीनांचा आधार ! मायेचा पाझर !
ज्ञानाचा सागर! भीमबाबा !!१!!

विचारांचे दीप! क्रांतीचे वादळ !
ज्ञानाचे काजळ! अखंडित !!२!!

लेखणीचा जोर! मनुला गाढला !
अंधार मिटला! समाजाचा !!३!!

संघर्षाची धग! हक्कांचा निर्धार!
अन्याया प्रहार ! जय भीम !!४!!

समतेचा मंत्र! बंधुत्वाची कास!
शिक्षणाची आस ! भीम माझा !!५!!

बहुजन वाली ! मोडे रूढीवाद !
समतेची साद ! बहुजना !!६!!

भीम जयघोष! सत्य साक्षात्कार!
न्यायाचा विस्तार! संविधान !! ७!

**खाजाभाई बागवान**

## श्रीक्षेत्र जगन्नाथपुरी, गंगासागर एक धाम तिर्थयात्रा यशस्वी केल्याबद्दल शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांचा हृद्य सत्कार सोहळा संपन्न

लिंबागणेश:- ( दि.२९) श्रीगुरू ईश्वर बाबा भारती यात्रा सत्संग निमित्ताने श्रीक्षेत्र जगन्नाथपुरी, गंगासागर एक धाम तीर्थ यात्रा,(ओडीसा ) भगवान श्री राम लल्ला जन्मभूमी अयोध्या ( उत्तर प्रदेश) तिर्थ यात्रा यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल आज दि.२९ मंगळवार रोजी सकाळी ग्रामपंचायत लिंबागणेश यांच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात यांनी यात्रेचे आयोजक श्रीगुरू ईश्वर बाबा भारती बेलेश्वर संस्थान,बेलगावचे मठाधिपती शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन महाराजांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिम टायगर ग्रुप बीड जिह्लाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी तर सूत्रसंचालन हरिओम क्षीरसागर यांनी केले.यात्रेत सहभागी झालेले गणपत तागड यांनी



आपल्या यात्रेदरम्यान अनुभव सांगताना यात्रेकरूंना धार्मिक स्थळांची महती व आस्थेने यात्रेकरूची काळजी घेतली याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. याचवेळी ह.भ.प. अनंतकाका मुळे यांनी समायोजित मार्गदर्शन केले. शांती ब्रम्ह तुकाराम महाराज यांनी सत्काराला उत्तर देताना हे तिर्थयात्रेचे तिसरे वर्ष असुन गेल्यावर्षी ३०० भाविकां समवेत द्वरकाधाम करण्यात आले होते.यावर्षी ५०० भाविकांचा सहभाग ९ स्लिपर कोच गाड्यांची व्यवस्था करण्यात आली होती.दि.१२ एप्रिल रोजी बेलेश्वर संस्थान येथुन प्रस्थान करून मध्यप्रदेशातील ओंकारेश्वर, उज्जैन येथील महाकाल ज्योतिर्लिंग तसेच उत्तर प्रदेश प्रयागराज त्रिवेणी संगम स्नान ,, अयोध्या शरयु नदी स्नान, श्रीराम जन्मभूमी मंदिर दर्शन, हनुमान गढी दर्शन वाराणसी येथे गंगानदी स्नान,काशि विश्वनाथ मंदिर दर्शन, कालभैरव मंदिर दर्शन,८४ घाटांचे दर्शन, बिहार येथील बौद्ध गया गौतम बुद्ध स्मारक, पश्चिम बंगाल येथे गंगा सागर संगम, कपिल मुनी आश्रम,ओडीसा मधील जगन्नाथ पुरी (चारधाम पैकी एक),कोणार्क सुर्य मंदिर दर्शन, भुवनेश्वर लिंगराम मंदिर दर्शन, महाराष्ट्रातील रामटेक येथील श्रीराम मंदिर दर्शन,शेगाव येथील श्रीसंत गजानन महाराज समाधी दर्शन आदि तिर्थक्षेत्रांचे दर्शन करून दि.२६ एप्रिल रोजी बेलेश्वर संस्थान बेलगाव याठिकाणी समारोप करण्यात आला.भविष्यात आणखी मोठ्या प्रमाणावर भाविकांच्या सहकार्याने धार्मिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. लिंबागणेश येथील ग्रामस्थांनी शांती ब्रम्ह तुकाराम महाराजांची सजवलेल्या रथातून मिरवणूक काढत सुवासिनींनी औक्षण करत लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर मंदिरापर्यंत आतिषबाजी करत मिरवणूक काढण्यात आली. शेवटी आभार प्रदर्शन डॉ.गणेश ढवळे यांनी केले.यावेळी माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात,महादेव कुदळे, दादा गायकवाड, अँड . गणेश वाणी,पांडुरंग वाणी,संतोष भोसले,संजय घोलप,वरद जोशी, चेतन कानिटकर, गणेश लिंबेकर, आदि उपस्थित होते.
डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

## महात्मा फुले बिग्रेड चे शेतकर्याला कर्जमाफी साठी निवेदन



विदर्भ प्रतिनिधी सुधीर ढगे : महात्मा फुले ब्रिगेड सामाजिक संघटनेच्या वतिने विविध ठिकाणी तहसीलदार साहेब यांच्या मार्फत संस्थापक अध्यक्ष स्वप्निल बोबडे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी,तसेच बि बियाणे,किटक नाशके,व रासायनिक खते यावर जि एस टी लाऊ नये याकरीता निवेदन देण्यात आले आहे सदर निवेदनाची दखल न घेतल्यास महात्मा फुले ब्रिगेड उग्र आंदोलन करण्यात येनर असल्याची प्रतिक्रिया संस्थापक अध्यक्ष स्वप्निल चंद्रशेखर बोबडे यांनी दिली*

## परळी वै. दिवाणी व फौजदारी नूतन इमारत न्या. नितीन सूर्यवंशी यांच्या हस्ते आज कोनशिला समारंभ

बीड, दि. 30 परळी वैद्यनाथ येथे बांधण्यात येणा-या दिवाणी आणि फौजदारी न्यायालय नूतन इमारतीचा कोनशिला समारंभ उद्या गुरुवार दि. 1 मे 2025 रोजी, महाराष्ट्र दिनी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन भगवंतराव सूर्यवंशी यांच्या हस्ते सकाळी 11.00 वाजता होणार आहे.

या कार्यक्रमास राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती रविंद्र मधुसूदन जोशी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश आनंद लक्ष्मीकांत यावलकर हे असतील.

या कोनशिला समारंभास उपस्थित रहावे असे आवाहन परळी वकील संघाचे अध्यक्ष ॲड हरिभाऊ गुटटे आणि दिवाणी न्यायधिश (क. स्तर) तथा न्यायदंडाधिकारी दीपक बोर्डे यांनी केले आहे.

### पर्यावरण व वातावरणीय बदल,पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा

बीड, दि. 30 पर्यावरण व वातावरणीय बदल,पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

गुरुवार दि. 1 मे 2025 रोजी सकाळी 8.30 वाजता जालना येथून वाहनाने परळी वैद्यनाथ जि. बीडकडे प्रयाण सकाळी 11.00 वाजता बीड येथे आगमन व परळी वैद्यनाथ येथील दिवाणी व फौजदारी न्यायलयाचे नुतन इमारतीच्या कोनशिला समारंभास उपस्थिती.

दुपारी 1.00 ते 3.00 वाजेपर्यंत यशश्री निवासस्थान परळी येथे अभ्यांगतांच्या भेटी व संवाद. दुपारी 4.00 वाजता भारतीय जनता पार्टीच्या बीड जिल्हयातील नवनिर्वाचित मंडळ अध्यक्षांशी संवाद व सत्कार. सायंकाळी 5.30. वाजता परळी वैद्यनाथ येथून वाहनाने अंबाजोगाईकडे प्रयाण.सायंकाळी 6.00 वाजता आगमन व डॉ. विजय कराड यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

सायंकाळी 6.30 वाजता वाहनाने परळीकडे प्रयाण. सायंकाळी 7.00 वाजता यशश्री निवासस्थान,परळी येथे आगमन व राखीव.

शुक्रवार दि. 2 मे 2025 रोजी सकाळी 10.50 वाजता वाहनाने नटराज रंगमंदिर, परळीकडे प्रयाण. सकाळी 11.00 वाजता आगमन व राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत पशुपालकांच्या एक दिवशीय कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी 7.00 वाजता यशश्री निवसस्थान परळी येथे आगमन व राखीव.

शनिवार दि. 3 मे 2025 रोजी माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव येथून वाहनाने जालनाकडे प्रयाण.

*****

## बीडमध्ये ढोल-ताशांच्या गजरात महाराष्ट्र गौरव रथयात्रेचे स्वागत राष्ट्रवादीचे नेते बळीराम गवते यांनी आणली धाकटी पंढरी

बीड: महाराष्ट्र राज्याच्या ६५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र गौरव रथयात्रेचे महाराष्ट्रभर आयोजन केले आहे. मराठवाडा विभागाच्या रथयात्रेचे बुधवार, दि.३० एप्रिल रोजी दुपारी १.३० वाजता राष्ट्रवादीचे नेते बळीराम गवते यांनी बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ढोल ताशांच्या गजरात स्वागत केले.

महाराष्ट्र राज्याच्या ६५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र गौरव रथयात्रेचे महाराष्ट्रभर आयोजन केले आहे. विविध धार्मिक आणि ऐतिहासीक स्थळांची माती एकत्रित केली जात आहे. शिवाय विविध नद्यांचे जलही गोळा केले जात आहे. यावेळी राष्ट्रवादीचे नेते बळीराम गवते यांनी धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गड भगवानगड , शहेनशहा वली दर्गा या पावन भुमीतील माती आणि विविध नद्यांचे संकलित केलेल्या पवित्र जल बीडमध्ये आणले होते. यानंतर या जलाने कलश पुजन करण्यात आले. कलशपुजन कार्यक्रमात मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. महाराष्ट्र



गौरव रथयात्रेचे महाराष्ट्रचे समन्वयक आ.विक्रम काळे यांचे याठिकाणी शाल पुष्पगुच्छ देवून कार्यकर्त्यांसमवेत स्वागत केले. कार्यक्रमाला राष्ट्रवादी सेवादलाचे राज्य कार्याध्यक्ष शिवाजी बनकर, राष्ट्रवादीचे जिह्लाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, रमेश आडकसर, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, अंकिता विधाते, दत्ता भांगे, योगेश क्षीरसागर, अविनाश नाईकवाडे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष महादेव उबाळे, शहराध्यक्ष बाळासाहेब गुजर, शेख तय्यब, फारूक पटेल, शेख निजाम, हारून इनामदार, केजच्या नगराध्यक्षा सिता बनसोड, बाजीराव धर्माधिकारी, ॲड.प्रज्ञा खोसरे, केशव तांदळे, अजिंक्य आनेराव, श्रीकांत नवले, शेख मुस्ताक, फय्याज पठाण, अमोल पवार आदि पदाधिकारी उपस्थित होते.

## लिंबागणेशच्या जडणघडणीचा मुक साक्षीदार असणाऱ्या वटवृक्षाला भिषण आग; २ तासानंतर अग्निशामक दलाला आग विझविण्यात यश :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- ( दि.२९ ) बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती देवस्थानामुळे प्रसिद्ध असलेल्या अडीचशे वर्षांपूर्वीचा ४-५ पिढ्यांचा लिंबागणेशच्या जडणघडणीचा मुक साक्षीदार असणा-या वटवृक्षाला आज दि.२९ मंगळवार रोजी सकाळी आग लागली. डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी यांनी बीड नगरपरीषदेच्या अग्निशामक दलाशी संपर्क साधुन दुर्दैवी घटनेची कल्पना दिली.अर्ध्यातासात बीड नगर परीषदेचे अग्निशामक दलाचे रमेश आदमाने,अक्षय नखाते आणि वाहन चालक अनिकेत कपाळे यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला. २ तासांच्या अथक प्रयत्नांनतर आग विझविण्यात यश आले.दरम्यान पाणी संपल्याने लिंबागणेश येथील गावाला टँकर द्वारे पिण्याचे पाणी पुरवठा करणाऱ्या दादाराव येडे यांनी विनामूल्य आग विझवण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले. बीड वनपरीक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांना कळल्यानंतर वनविभागाचे दोन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला.



बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानक परिसरातील जवळपास अडीचशे वर्षांपूर्वीच्या वटवृक्षाला आज सकाळी ९ च्या सुमारास आग लागल्याचे निदर्शनास आले. ग्रामस्थांनी याठिकाणी गर्दी केली होती. आगीने रौद्ररूप धारण केल्याने आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाला पाचारण केले. आगीत वटवृक्षाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व विक्रांत वाणी यांनी बीड अग्निशामक दलाला तसेच वनपरीक्षेत्र अधिकारी काकडे यांना फोटो आणि व्हिडिओ पाठवुन वडाला लागलेल्या आगीची कल्पना दिली. या झाडांवर वास्तव्यास असलेल्या पक्षांची घरटी आगीत जळून खाक झाली. मानवी निष्काळजीपणामुळे आगीच्या घटनेत वाढ :- डॉ.गणेश ढवळे उन्हाची तिव्रता वरचेवर वाढत चालली आहे. ग्रामीण भागात ग्रामस्थांनी कचरा व शेतकऱ्यांनी खोडवा पेटवण्याच्या घटनांमुळे वृक्ष आगीत होरपळून जात आहेत. ग्रामस्थांनी वारंवार आवाहन करूनही वृक्षांचे गांभीर्य लक्षात येत नसल्याचे आजच्या घटनेवरून दिसून येत आहे. पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी प्रत्येक माणसाने वृक्ष लागवड,वृक्ष संगोपन आणि आगीपासून संरक्षण करण्याची आवश्यकता असल्याचे वृक्षप्रेमी डॉ.गणेश ढवळे यांनी आवाहन केले आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

## महात्मा बसवेश्वर पुतळ्याभोवती सीसीटीव्ही, डोमची व्यवस्था करु : योगेश क्षीरसागर

बीडमध्ये जयंतीनिमित्त महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्याला अभिवादन

बीड (प्रतिनिधी) शहरात असलेल्या महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याची वारंवार होणारी विटंबना थांबविण्यासाठी चबुतऱ्याची उंची वाढवून सीसीटीव्ही कॅमेऱ्याची लवकरच व्यवस्था करुन पुतळ्याभोवती डोम बसविणार असल्याची घोषणा राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली. वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त बुधवारी आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी नगरसेवक प्रेम चांदणे, बाळू गुंजाळ, अशोक लोढा, प्रकाश कानगावकर, उत्तरेश्वरअप्पा कानडे, कपिलधार देवस्थानचे उपाध्यक्ष शिवशंकर भुरे, बाळूसेठ मिटकरी, अशोक शहागडकर तसेच समाजातील ज्येष्ठ नागरिक



उपस्थित होते. प्रारंभी सकाळी अकरा वाजता डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने शिवशंकर भुरे, बाळूसेठ मिटकरी यांच्या हस्ते डॉ.क्षीरसागर यांच्यासह उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. पुढे डॉ.क्षीरसागर म्हणाले की, बीडच्या ऐतिहासिक चमणच्या विकासासाठी तीन कोटींचा आराखडा प्रस्तावित असून याला लवकरच मंजूरी मिळेल. यामध्ये महात्मा बसवेश्वर यांच्यासह परिसरातील पुतळ्याच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह चबुतऱ्याची उंची वाढविण्यात येणार आहे. चमणच्या परिसरात असलेल्या दोन एकर जागेवर वॉकिंग ट्रॅक करण्याचा प्रस्ताव असल्याचे क्षीरसागर म्हणाले. वीरशैव लिंगायत समाज हा शांत, संयमी समाज म्हणून ओळखला जातो. महात्मा बसवेश्वर हे लिंगायत समाजाचे धर्मगुरु आहेत. त्यांच्या विचारांची सर्वच समाजाला गरज असल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविक वालवकर यांनी केले. यावेळी वीरशैव समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भावी उद्योजक ही देशाची खरी संपत्ती : डॉ. एस. व्ही. संत




परळः आर. एम. भट्ट शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी “ आम्ही उद्योजक “ हा उपक्रम नुकताच राबविण्यात आला. या प्रसंगी या उपक्रमातून तयार होणारे भावी उद्योजक ही देशाची खरी संपत्ती असल्याचे मत गोखले एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी संत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मत व्यक्त केले. यानिमित्ताने कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते गोखले एज्युकेशन सोसायटीच्या अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेंद्र हेरकळ यांनी उद्योग सुरू करण्यासाठीचे ०-१ व १-N ही दोन सुत्रे असून नाविन्यपूर्ण उद्योग पहिल्या सुत्राचा भाग असून दुसरे सूत्र हे अस्तित्वात असलेल्या उद्योगांसाठी लागू पडते हे सांगताना त्यांनी उद्योजक बनण्यासाठी पुढे आदर्श चांगले ठेवा व भावी उद्योजकांना रतन टाटा हे खरे आदर्श आहेत हे उद्गार काढले. तसेच नोोकरी करणारे बनविण्यापेक्षा नोकरी देणारे बना असा कानमंत्र रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कारंडे सर यांनी दिला. या मेळाव्याला १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. वेगवेगळ्या प्रकारचे खाद्यपदार्थ, मिठाई, केक, स्टेशनरी यांचे स्टॉल्स लावले होते. बी.एड. विभागाच्या वतीने पुस्तक प्रदर्शन व बौद्धिक खेळ यांचे प्रदर्शन करण्यात आले होते. पालकांनी देखील यावेळी उपस्थिती दर्शवली होती. भट्ट विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. महाले सर , संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. जठार सर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन आणि मार्गदर्शन हे श्री. अनिल परब सर यांनी केले व सुत्रसंचलन हे सौ. परब यांनी केले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरवार १ मे २०२५
https://lokaarambh.com



# केंद्राचा जातीनिहाय जनगणनेचा निर्णय, आता काँग्रेसचं म्हणणं काय?



केंद्र सरकारने नुकतेच जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानंतर आता राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून देशात जातीनिहाय जनगणना करावी, अशी मागणी काँग्रेसकडून केली जात होती. आता सरकारच्या या निर्णयानंतर काँग्रेसचे नेते तथा आमदार विजय वडेट्टीवार यांनी काँग्रेसची भूमिका मांडली आहे. त्यांनी सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. आता सरकारच्या या निर्णयानंतर काँग्रेसचे नेते तथा आमदार विजय वडेट्टीवार यांनी काँग्रेसची भूमिका मांडली आहे. त्यांनी सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. विजय वडेट्टीवार नेमकं काय म्हणाले? जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर विजय वडेट्टीवारी यांनी प्रतिक्रिया दिली. “केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे मी केंद्र सरकारचे स्वागत करतो. खरंतर ही मागणी राहुल गांधी सातत्याने करत होते. ज्यांची जेवढी संख्या भारी, त्यांची तेवढी हिस्सेदारी अशी आमची भूमिका होती,” अशी प्रतिक्रिया वडेट्टीवार यांनी दिली. केंद्र सरकारने नेमका काय निर्णय घेतला? केंद्रीय मंत्रिमंडळाची आज महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत सरकारने अनेक मोठे निर्णय घेतले. मंत्रिमंडळ बैठकीत नेमकं काय काय घडलं? कोणते निर्णय घेण्यात आले? याची संक्षिप्त माहिती सांगण्यासाठी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पत्रकार परिषदेत त्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती दिली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार आगामी जनगणनेसोबत देशात जातनिहाय जनगणना केली जाईल. काँग्रेसची नेमकी मागणी काय होती? काँग्रेसने बऱ्याच काळापासून संपूर्ण देशात जातनिहाय जनगणना व्हावी अशी मागणी केली होती. याच मागणीला केंद्रस्थानी ठेवून काँग्रेसने लोकसभेची निवडणूक लढवली होती. आम्ही सत्तेत आलो तरी देशभरात जातीनिहाय जनगणना करू, असे अश्वासन तेव्हा काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी दिले होते. तसेच महाराष्ट्रासह इतरही राज्यांच्या निवडणुकांत त्यांनी मतदारांना हेच आश्वासन दिले होते. सरकारच्या वेगवेगळ्या खात्यात कोणत्या समाजाचे किती प्रतिनिधीत्त्व आहे, हे समजणे गरजेचे आहे. हे सत्य समोर आल्यास आगामी धोरण ठरवणे सोपे होईल, अशी भूमिका काँग्रेसने घेतली होती.

## व्यसन एक आजार : हे सर्वांना समजून घेणे आवश्यक आहे

आज आपण प्रत्येक ठिकाणी पाहतो, कि तरुण पिढी व्यसनात डुबत चाललेली आहे. आणि तो व्यसन नावाचा डोह इतका मोठा आहे कि त्याची जाणीव सुद्धा एखाद्या व्यसनी व्यक्तीला नसते. तो त्याच्याच जगात मधमस्त होऊन जगत असतो, सर्व जगाचा, समाजाचा, कुटुंबाचा व स्वतःच्या आयुष्याचा विसर पडलेला हा व्यक्ती कोणाचं काहीच ना ऐकायला तयार असतो ना समजायला. नशा ही एक असा चक्रव्युह आहे कि एखाद्या चांगल्या व्यक्तिलाही कधी खेचत नेईल याचा नेम नाही. आजही तरुणाई कशी संपत चालली आहे याचे बरेच जिवंत उदाहरणे आपल्या अवतीभवती आपल्याला दिसत असतात.

एका व्यसनी व्यक्तीमुळे त्याचा उद्धवस्त झालेला परिवार, त्याच्या मुलांची स्वप्ने, पत्नीचा अपमान आणि आई वडिलांची सुन्न चेहरे ज्यांना सावरायलाही कोणीच समोर येत नाही अशा उद्धवस्त परिवाराला व त्या व्यसनात होरपडत असलेल्या व्यक्तीला मदतीचा जर कोणी हात देत असेल तर ते म्हणजे हिरिहिरीने, जिद्दीने पयत्न व परिवर्तन घडवून आणणारे व्यसनमुक्ती केंद्र.

अगदी जिवावर उदार होऊन कसल्याही परिणामांची पर्वा न करता 24 तास अलर्ट राहून काम करत असतात. कोणतीही अपेक्षा न ठेवता. आस फक्त इतकीच कि, एक व्यसनी व्यक्ती सुधारला तर त्याचं अख्य कुटुंब सुखी व समाधानी होऊन जगेल.

व्यसन व व्यसनमुक्ती केंद्र याबद्दल बऱ्याच ठिकाणी अजूनही जनजागृती नाही. बऱ्याच लोकांना वाटते कि, केंद्रात गेला म्हणजे हा पूर्णपणे दुरुस्त व्हायलाच पाहिजे, याने पुन्हा कधीच व्यसन करू नये, आणि नशा केली तर ते संपूर्ण दोष त्या केंद्रावर टाकत असतात, हे एखाद्या कुटुंबाला वाटणे स्वाभाविक आहे, पण त्यांना त्यामागचं कारणच कळत नाही, हे समजून घेणे खूप आवश्यक आहे. व्यसन हा आजार आहे आणि तो कोणालाही, कधीही होऊ शकतो. यात तिळमात्रही शंका नाही. उदा. ताप आला..औषध घेतली म्हणून पुन्हा आपल्याला ताप येणार नाही का? किडनी स्टोन झाला, ऑपरेशनही केलं म्हणून पुन्हा होणार नाही का? होत असतेच...म्हणून आपण डॉक्टरांना दोष द्यायचा का? तसंच या व्यसनाचही आहे. व्यसनमुक्तीच्या उपचाराची पुन्हा पुन्हा गरज पडणे हे साहजिक आहे. आणि यामागच मुख्य कारण म्हणजे हा उपचार घेणाऱ्याची सकारात्मक व नकारात्मक मानसिकता. व्यसन हा शारीरिक व मानसिक आजार आहे, जो उपचाराबरोबर प्रबळ इच्छाशक्तीने बरा होतो. एखाद्याने व्यसनमुक्ती केंद्रात उपचार घेतल्यावर पुन्हा त्याला भरती करावं लागणार नाही असं नसते. पण प्रत्येकांना नेहमीच उपचार घ्यावा लागेल असेही नसते. काही जन एकाच उपचाराने रिकव्हर होतात, तर काही वारंवार उपचार घेतल्यानंतरही लवकर रिकव्हर होत नाही. त्यामागचं कारण म्हणजे इच्छाशक्ती व मानसिकता. कारण उपचार देणाऱ्या प्रमाणेच उपचार घेणाऱ्यानेही तो स्वीकारायला हवा तेव्हा तो उपचार पूर्णत्वास येत असतो. ही गोष्ट सर्वसाधारण लोकांना समजणे आवश्यक आहे. हे जर समजले नाही तर ते केंद्राचा उपचारही समजू शकणार नाही.

## संस्कार इंग्लिश स्कुल मध्ये आईस्क्रीम पार्टीचे आयोजन



आज दिनांक 30 एप्रिल 2025 रोजी संस्कार इंग्लिश हायस्कूल नामलगाव फाटा येथे विद्यार्थ्यांसाठी आईस्क्रीम पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. सीबीएससी ची शाळा 2 एप्रिल पासून सुरू झाली होती. एप्रिल महिन्यामध्ये शाळेत विविध नवीन उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या बेसिक कन्सेप्ट क्लिअर करण्यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न केले. विद्यार्थ्यांनी क्रिया कृती द्वारे आपले ज्ञान वृद्धिंगत केले. आज 30 एप्रिल रोजी शाळेला उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या. यावेळी विद्यार्थ्यांना सुट्टीत घरचा अभ्यास देण्यात आला. तसेच शाळेच्या प्राचार्या सुजा मॅडम यांनी सुट्टीतील अभ्यासाचे महत्त्व समजावून सांगितले व विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी प्रेरित केले व उन्हाळ्यात घ्यावयाची काळजी याविषयी ही मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना घरी जाण्यापूर्वी आईस्क्रीम पार्टीचे आयोजन विद्यालयाकडून करण्यात आले होते. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या सुजा मॅडम उपप्राचार्य, जॉन सर, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी लहान विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद होता.

## मंजुर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय लवकरात लवकर कार्यान्वित करा : वकील संघाची मागणी



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : किनवट येथे काही महिन्यांपूर्वी मंजूर झालेले अतिरिक्त जिह्ला व सत्र न्यायालय लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी दि.२९ रोजी किनवट न्यायालय अभिवक्ता संघाने नांदेड जिह्ला न्यायाधिश वेद पाठक यांची भेट घेऊन चर्चा केली. मागणी संदर्भात न्यायाधिशांची अनुकूल भूमिका असल्याचे वकील संघाने सांगितले.

यावेळी किनवट न्यायालय अभिवक्ता संघाचे अध्यक्ष अँड. किशोर मुनेश्वर, सचिव माज बडगुजर, उपाध्यक्ष टेकसिंग चव्हाण, अँड. सुभाष ताजणे, अँड.यु.बी. चव्हाण यावेळी उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेची पाटोदा तालुका कार्यकारणी जाहीर.

### अध्यक्षपदी ऋषिकेश गवळी, उपाध्यक्ष श्याम माने सचिव पदी भागवत गोपाळघरे

पाटोदा प्रतिनिधी:- विद्युत क्षेत्रातील अनेक कर्मचारी, बाह्य स्त्रोत कर्मचारी यांच्या अडचणी सोडवण्यासाठी त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहून मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेनी विद्युत क्षेत्रात महत्त्वाचे स्थान मिळवले आहे. अडचणीच्या काळात कर्मचाऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहून कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास न ढळता न्याय मिळवून देण्याचे काम या संघटनेमार्फत कायम घडत आले आहे. आणि याच विश्वासावर संघटनेमध्ये अनेक कर्मचारी यांनी जाहीर प्रवेश करत विविध पदावर स्थान मिळवले आहे.

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या पार पडलेल्या कार्यकारिणीत पाटोदा तालुका अध्यक्षपदी मा. ऋषिकेश



गवळी, उपाध्यक्ष. मा. श्याम माने,. सचिव मा. भागवत गोपाळघरे यांची निवड करण्यात आली आहे. कंपनी व कामगार हित, सामाजिक औद्योगिक शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी, व उद्भवणारे अन्यायकारक प्रश्न परिस्थिती सोडवण्यासाठी संघटना कार्यकर्ते त्या उद्देशाने आपल्या प्रशासनाची पत्रव्यवहार चर्चा, वेळप्रसंगी आंदोलन करून प्रश्न मार्गी लावण्याकरिता आपल्या निवडी केल्या आहेत.असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

संघटनेचे अधिकार पत्र श्री. सावकारे साहेब उपकार्यकारी अभियंता यांना देताना बीड विभाग अध्यक्ष श्री. विकी वाघमारे, व जेष्ठ सहकारी श्री अनिल काळुशे,श्री .महेश भोंडवे, व श्री. हजारें उपस्थित होते.यावेळी नवीन सदस्याचे चे अभिनंदन करून व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या..

# पूर्वीचा कणखर महाराष्ट्र आज आहे काय? सामनातून घणाघात, कटू सवाल करत म्हणाले

दरवर्षी १ मे हा दिवस ‘महाराष्ट्र दिन’ म्हणून साजरा केला जातो. १९६० साली या दिवशी संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि मराठी माणसाच्या अस्मितेला, संस्कृतीला आणि भाषेला स्वतंत्र राज्याचा हक्क मिळाला. आज याच महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत शिवसेना ठाकरे गटाने जोरदार टीका केली आहे. ‘राकट देशा, कणखर देशा…’ असे महाराष्ट्राचे वर्णन आपण महाराष्ट्र गीतामध्ये वाचतो. पण हा गौरव केवळ कवितेपुरता मर्यादित असून चालणार नाही. दिल्लीपुढे शेपूट घालणाऱ्यांनी हिमालयाच्या मदतीला धावणारा सह्याद्री कमजोर केला आहे. पूर्वीचा तो कणखर महाराष्ट्र आज राहिला आहे काय? असा थेट सवाल शिवसेना ठाकरे गटाने सामना अग्रलेखातून केला आहे. शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या सामना वृत्तपत्राच्या अग्रलेखातून सत्ताधाऱ्यांवर टीका करण्यात आली आहे. पहलगाम हल्ल्यावरुन ठाकरे गटाने भाजप सरकारवर टीका केली आहे. आज मराठी मुलुखात महाराष्ट्र दिनाचा उत्सव साजरा होत असताना या सोहळ्यात खऱ्या अर्थाने महाराष्ट्रधर्माचा गजर व जागर व्हायला हवा. पण या राज्यात महाराष्ट्रधर्माचे खरोखरच पालन होत आहे का? असाही सवाल करण्यात



आला आहे. सामना अग्रलेखात काय? उद्यमशील व प्रगत राज्य ही कधीकाळी महाराष्ट्राची ओळख होती. पण हे ‘भूषण’ पुसून कर्जबाजारी व शेतकरी आत्महत्यांचे राज्य असे ‘दूषण’ आज महाराष्ट्राला मिळत असेल तर ते वाईट आहे. ‘राकट देशा, कणखर देशा…’ असे महाराष्ट्राचे वर्णन आपण महाराष्ट्र गीतामध्ये वाचतो. पण हा गौरव केवळ कवितेपुरता मर्यादित असून चालणार नाही. दिल्लीपुढे शेपूट घालणाऱ्यांनी हिमालयाच्या मदतीला धावणारा सह्याद्री कमजोर केला आहे. पूर्वीचा तो कणखर महाराष्ट्र आज राहिला आहे काय? शेतकऱ्यांच्या घामातून व 107 हुतात्म्यांच्या रक्तातून दिमाखात उभ्या राहिलेल्या महाराष्ट्राचा लौकिक कायम ठेवायचा तर मराठी जनतेला पुन्हा एकदा लढावेच लागेल. महाराष्ट्रधर्म जागवावाच लागेल!, असे सामनात म्हटले आहे. देशावर युद्धाचे सावट आले असतानाच आज 65व्या महाराष्ट्र दिनाचा सोहळा साजरा होत आहे. देशावर कोणतेही संकट आले आणि त्या संकटाशी दोन हात करण्यासाठी महाराष्ट्र धावला नाही असे कधी घडले नाही. पण तो कणखर, बाणेदार महाराष्ट्र आज कुठे दिसतो आहे काय? अर्थात आजही काही जणांना स्वतः सह्याद्री असल्याचा साक्षात्कार होतो. हिमालयाच्या मदतीस निघाल्याचा आव ते आणतात खरा, पण प्रत्यक्षात ते दिल्लीपुढे झुकण्यासाठीच तेथे पोहोचतात. दिल्लीच्या वाटेवरचे ‘पाय-पुसणे’ अशीच अवस्था त्यांनी महाराष्ट्राची करून ठेवली आहे. हे या मऱ्हाटी राज्याचे दुर्दैवच म्हणायला हवे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com